# तिफण

वर्ष : १३ वे । अंक १ला । एप्रिल-मे-जून - २०२२



कुळवाडीभूषण

## छत्रपती शिवाजी महाराज

विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

Late Ganesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

UGC Care Listed Journal, ISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

## कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक

[भाग-१]

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. सर्जेराव जिगे डॉ. यशवंत सोनुने

● संपादक मंडळ ●

डॉ. सुभाष बागल
डॉ. सुभाष शेकडे
डॉ. एकनाथ शिंदे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. दत्तात्रय डुंबरे
डॉ. राज मुसणे
डॉ. दिलीप बिरुटे
डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. रंजना कदम
डॉ. सुखदेव इघारे

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani


| | | |
|---|---|---|
| ३२. | छ. शिवाजी महाराजांच्या पत्रातील पर्यावरण<br>- प्रा. डॉ. म. ई. तंगावार | ११७ - ११८ |
| ३३. | शिवाजी महाराजांच्या संदर्भातील हिंदी साहित्य व संशोधनातील नोंदी<br>- डॉ. संदीप जोतिराम भुयेकर | ११९ - १२३ |
| ३४. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- दीपक शिवदास पाटील | १२४ - १२७ |
| ३५. | छत्रपती शिवाजी महाराजांचे राजकीय कर्तृत्व<br>- बाबासाहेब पांडुरंग लबडे | १२८ - १३१ |
| ३६. | छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी बखर<br>- प्रा. डॉ. भैया डी. पाटील | १३२ - १३५ |
| ३७. | शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय देणारे 'आज्ञापत्र'<br>- प्रा. उगम उमेश परब | १३६ - १३८ |
| ३८. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- प्रा. डॉ. विनायक पवार व प्रा. कृष्णा नागरे | १३९ - १४२ |
| ३९. | 'सभासदाची बखर' यातून चित्रित झालेले शिवरायांचे चरित्र<br>- प्रा. डॉ. जगताप यू. एस. | १४३ - १४५ |
| ४०. | शिवाजी महाराजांची पर्यावरणनीती : एक चिंतन<br>- डॉ. राजेश्वर दिनकर रहांगडाले | १४६ - १४९ |
| ४१. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- प्रा. डॉ. संगीता मोरे | १५० - १५३ |
| ४२. | भारतीय आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज<br>- प्रा. सखाराम बाबाराव कदम | १५४ - १५८ |
| ४३. | छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी साहित्य<br>- डॉ. रामलीला सुदामराव पवार | १५९ - १६२ |
| ४४. | शिवकालीन कागद - एक चिकित्सक अभ्यास<br>- प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा | १६३ - १६६ |
| ४५. | छत्रपती शिवाजी महाराज आणि कला व स्थापत्य<br>- डॉ. नामदेव विठ्ठल शिंदे | १६७ - १७० |
| ४६. | छत्रपती शिवाजी महाराजांची धर्मनीती<br>- प्रा. डॉ. प्रदीप महादेव जगताप | १७१ - १७५ |
| ४७. | महात्मा फुले आणि कुळवाडीभूषण शिवाजीराजे<br>- जी. ए. उगले | १७६ - १७८ |

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



# भारतीय आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज

- प्रा. सखाराम बाबाराव कदम
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
कै. रमेश वरपूडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी, मो. ९९७५३८०००४

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी पुणे जिल्ह्यात शिवनेरी किल्ल्यावर राजमाता जिजाऊ यांच्या पोटी झाला. अत्यंत हुशार आणि कुशाग्र बुद्धीचे हे बाळ राजमाता जिजाऊ यांच्याकडून संस्कार व शौर्याचे धडे घेऊ लागले. राजमाता जिजाऊंनी त्यांना स्वराज्याचे स्वप्न दाखवले. यासाठी प्रसंगी रामायण, महाभारतासारख्या कथा प्रसंगांचा आधार घेऊन राजनीतीची शिकवण देत होत्या. वडील शहाजीराजे भोसले यांच्याकडून मिळालेला शौर्याचा वारसा त्यांनी अधिक वृद्धिंगत केला. युद्ध, राजनीती व शौर्याचे धडेदेखील शहाजीराजांकडून बाळ शिवबांना मिळाले. बाळ शिवाजी ते छत्रपती शिवाजी महाराज होईपर्यंतचा इतिहास अनेक रोमहर्षक प्रसंगांनी भरलेला आहे.

वयाच्या पंधराव्या वर्षी रायरेश्वराच्या मंदिरात जाऊन जिवाला जीव देणाऱ्या मावळ्यांसोबत घेतलेली स्वराज्य स्थापनेची शपथ गुलामगिरीतून मुक्ततेची घोषणा होती. पुढे चालून शिवाजीराजे हे शककर्ते झाले, ते या संकल्पामुळेच. तत्काळात ही गोष्ट एवढी सोपी नव्हती. बहामणीची उडालेली पाच शकले म्हणजेच दक्षिणेतील पाच शाह्या... त्यापैकी आदिलशाही, निजामशाही, व उत्तरेतील मुघल सल्तनत या तीन आघाड्यांवर संघर्ष करून शिवाजीराजांना स्वराज्याची स्थापना करावी लागली. याकामी शिवाजीराजांसोबत जिवाला जीव देणारे मावळे म्हणून बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, मुरारबाजी, नेताजी पालकर, कोंडाजी फर्जंद, मेजर प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते... अशा अनेक शूरवीरांनी शिवरायांना मोलाची साथ दिली. शिवाजीराजांच्या चातुर्याने आणि चाणाक्ष बुद्धीने, त्या मावळ्यांच्या साथीने स्वराज्यासमोरील बलाढ्य शत्रू जसे - अफझलखान, शाहिस्तेखान, औरंगजेब यांसारख्या अनेक मातब्बर शत्रूंना हरवून राजमाता जिजाऊंच्या स्वप्नाला सत्यात उतरवले. गड, किल्ल्यांचे महत्त्व जाणून अनेक किल्ले जिंकले, नवे किल्ले बांधले, जुन्या किल्ल्यांची डागडुजी केली. सोबतच ६ जून १६७४ रोजी रायगडावर राज्याभिषेक करून सुमारे साडेतीनशे वर्षे गुलामगिरीत खितपत पडलेल्या, जुलमी शासनाच्या अन्यायाने ग्रासलेल्या व अत्याचाराने त्रासलेल्या गोरगरीब रयतेला लोककल्याणकारी, न्यायप्रिय असा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रूपाने मिळाला. अन् तेथूनच खऱ्याअर्थाने हिंदवी स्वराज्याची वाटचाल आणि एक राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांची वाटचाल सुरू झाली.

छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण असे म्हणतात, "शिवरायांचे जीवन हे भारतीयांच्या जीवनातले एक भव्य आणि विशाल शिल्प आहे. आणि आणि आपले सद्भाग्य की छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने अति भव्य अशी एक चरित्र इतिहासाने भारताला दिले."

रवींद्रनाथ टागोर छत्रपतींबद्दल काय म्हणतात ते पाहणे येथे औत्सुक्याचे ठरेल. "मला एका वाक्यात जर कोणी भारताची ओळख विचारली तर मी सांगेन की पहिला समाज क्रांतिकारक तथागत भगवान बुद्ध आणि त्यांचे तत्वज्ञान व दुसरे युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रमी जीवन चरित्र ही माझ्या भारताची ओळख आहे." ज्या महापुरुषांबद्दल असे महनीय व्यक्ती म्हणत असतात अशा महापुरुषांच्या म्हणजे छत्रपती शिवाजीराजांच्या केवळ एका पैलूचा विचार आज आपण या शोधनिबंधानिमित्ताने करणार आहोत.

भारतीय आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज ही शिवकालीन इतिहासातील महत्त्वपूर्ण बाब म्हणून ओळखली जावी इतक्या मोलाची आहे. ज्या कार्यामुळे शिवाजीराजांची ओळख 'Father of Indian Navy' म्हणून छत्रपती शिवाजीराजांची ओळख सबंध जगाला झाली. भारताचा

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

इतिहास पाहिला असता शिवाजीराजांच्या पूर्वी समुद्रबंदी लागू होती. सागर ओलांडू नये, या मानसिकतेत जगणारा हा समूह असल्याचे दिसून येते. शिवाजीराजांचे आरमार सोडून कोणत्याच भारतीय राजाकडे आरमार नव्हते. 'ज्याचं आरमार त्याचा समुद्र; आरमार हे एक स्वतंत्र राज्यांगच आहे,' हे सूत्र छत्रपती शिवाजी महाराजांना चांगल्या प्रकारे माहीत होते. स्वतंत्र, सामर्थ्यवान आरमार निर्माण झाल्याशिवाय स्वराज्याला पूर्णत्व येणार नाही, हे शिवाजी महाराजांनी जाणले होते. इसवी सन १६५७ च्या सुमारास महाराज कोकणात उतरले, त्यावेळी त्यांनी समुद्र जवळून पाहिला. त्या वेळच्या परकीय सत्तांमध्ये मुघल, जंजिऱ्याचे सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज हे प्रामुख्याने होते. यापैकी मुघल सोडले, तर इतर तिघांचा पश्चिम किनाऱ्यावर मोठा धाक होता. या तिघांना कर दिल्याशिवाय कोणत्याही नौका समुद्रात विहार करू शकत नसत. मराठ्यांच्या व्यापाराला हा मोठा अडथळा होता. म्हणून डॉक्टर सेन त्यांच्या 'द मिलेट्री सिस्टीम ऑफ मराठा' या ग्रंथात म्हणतात, "Shivaji may be described as the father of Indian Navy."

शिवाजी महाराजांनी उभारलेले आरमार ही मराठा इतिहासातील दिशादर्शक आगळीवेगळी व सुवर्ण घटनाच आहे. कोकण प्रांत हा शिवाजी महाराजांच्या प्रदेशातील अविभाज्य प्रांत प्रदेश होता. शिवाजी महाराजांच्या राज्याची सरहद्द समुद्राला मिळाल्यानंतर मराठ्यांनी कोकण किनारपट्टीवरील सर्व प्रदेश काबीज करण्यास सुरुवात केली. कल्याण भिवंडी हा प्रदेश महाराजांनी काबीज केला. याचबरोबर १६५७-५८ मध्ये कोकण किनारपट्टीचा समुद्र किनारा महाराजांच्या ताब्यात आला व सिद्दीबरोबर त्यांचा संघर्ष सुरू झाला. हिंदुस्थानच्या दोन्ही बाजूला पसरलेल्या अफाट समुद्रावर सिद्दी व युरोपीयांची सत्ता चालत असे. त्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याच जहाजाला समुद्रात संचार करता येत नव्हता. पश्चिम किनारपट्टीच्या प्रदेशावर सिद्दी वारंवार लूटमार करत असे. या काळात शिवाजी महाराजांचा संबंध पोर्तुगिजांशी येऊ लागला. चाणाक्ष मुत्सद्दी शिवाजीराजांनी पोर्तुगिजांचे खरे बळ ठरत असल्याचे जाणवत त्यांच्या आर्मी उद्योगाची दखल घेतली. आपल्या राज्याच्या सुरक्षिततेसाठी व सुबत्तेसाठी नाविक सामर्थ्याची गरज महाराजांना जाणवली. तसेच सागरी वाहतुकीच्या उद्योगातून आणि बंदरापासून मिळणारे उत्पन्न राखण्यासाठी व्यापारी जहाजांची व बंदरांची गरज शिवाजी महाराजांनी ओळखली. यासाठी त्यांना आरमार स्थापनेची गरज वाटू लागली. इ.स. १६५९ मध्ये महाराजांनी समुद्रात स्वराज्याच्या आरमाराचे तोरण बांधायचे ठरवले व त्यानुसार स्वराज्याच्या मराठी आरमाराची किंबहुना पहिल्या भारतीय आरमाराची मुहूर्तमेढ रोवली गेली. यामुळेच छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय आरमाराचे जनक ठरले.

निजामशाहीतील कोकण प्रदेश काबीज केल्यावर शिवाजी महाराजांनी कल्याण, भिवंडी, पेण, कुलाबा, पनवेल, मालवण येथे युद्धनौका बांधण्याचे काम सुरू केले. युद्धनौका बांधण्याविषयीचे तांत्रिक ज्ञान पोर्तुगीज व टोपीकर कारागिरांकडून शिवाजी महाराजांच्या कारागिरांनी आत्मसात केले. १९ जुलै व १६ ऑगस्ट १६५९ मध्ये गोव्याच्या गव्हर्नरने पोर्तुगीज राजास पाठवलेल्या पत्रात शिवाजी महाराजांच्या आरमार उद्योगाच्या प्रारंभाचा, युद्धनौका बांधण्याचा उल्लेख प्रथम आढळतो. तसेच ३० सप्टेंबर १६५९ मध्ये वसईच्या कॅप्टनने गव्हर्नरला लिहिलेल्या पत्रात पोर्तुगीज खलाशी रुतलॅन्ताव्ह व्हियेगश व फेर्नांव्ह व्हियेगश यांच्या टोळीतील तीनशे पोर्तुगीज व टोपीकर कारागीर मराठा आरमारात युद्धनौका बांधण्यासाठी कार्यरत होते, असा उल्लेख आढळतो. या सर्व कामगारांना दरमहा पगार दिला जाई; परंतु पोर्तुगीज कॅप्टन 'जुआंव द सालाझार' यांनी या लोकांना पोर्तुगीज राजाशी एकनिष्ठ राहण्यासाठी प्रोत्साहन दिले, समजावले. यामुळे रुतलॅन्ताव्ह व्हियेगश याच्या टोळीतील ३४० आरमारी सैनिक व त्यांच्या बायका-मुलांसह ४०० पेक्षा जास्त असणारी माणसे शिवाजी महाराजांचे आरमार सोडून गेली; पण हे पोर्तुगीज टोपीकर कारागीर सैन्य पळून गेले म्हणून शिवाजी महाराजांचा आरमार उद्योग थांबला नाही, उलट तो अधिक जोमाने सुरू झाला.

जहाज बांधणीच्या आधी महाराजांनी समुद्रावरील चिंचोळ्या खाड्या, पाण्याची खोली, बंदरे, किनारपट्टीचा भौगोलिक प्रदेश यांचा परिपूर्ण अभ्यास केला होता. शिवाजी महाराजांच्या आरमारातील जहाजाचा आकार युरोपीयांच्या जहाजाशी तुलना करता लहान होता. मराठा आरमारात गुराबा, तरांडी, गलबत, शिबाड, पगार, मचवा, दुबार, गॅलीवेटस्, होडी, पाल, तिरकाटी, तारू या प्रकारची जहाजे होती.

- **गुराबा** - गुराबा हे सर्वांत मोठे जहाज असून त्याचे वजन तीनशे टन होते. या जहाजात दोन डोलकाठ्या असत. तीन डोलकाठ्यांचे गुराबा असत. गुराबात

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

बारा-बारा तोफा व ३०-४० सैनिक बसू शकत होते. छोटे गुराबा दीडशे ते दोनशे टन वजनाचे असत. यात सहा सात तोफा व पंधरा-वीस सैनिक बसू शकत.

- **गलबते -** गलबते ही दोनशे तीनशे टन वजनपर्यंत असत. गलबताना दोन शिडे असत. या दोन जहाजांची वैशिष्ट्ये म्हणजे यांच्या पठाणांची लांबी आणि नळीच्या तुळईची लांबी सारखी होती. पठाणाच्या नळीकडील भाग टोकदार होता. ही सर्व जहाजे अशा विशिष्ट रचनेची होती.
- **मचवा -** मचवा म्हणजे मोठी चौकोनी परंतु एकच सिडी असलेली बोट. तिचे वजन एक ते दीड टन असे.
- **शिवार -** शिवार म्हणजे मोठी चौकोनी परंतु मागील बाजू सपाट असलेली, दोन शिडे असलेली, शंभर टनांपर्यंत क्षमता असलेली बोट होय.
- **पगार -** सर्वांत छोट्या होडीला पगार असे म्हणत.
- **तिरकाटी -** तिरकाटी म्हणजे तीन डोलकाठ्यांचे जहाज होय.

मचवा, शिवार, तराडी, दुबार, तिरकाटी, पगार या शिवाजीराजांच्या आरमारातील व्यापारी नौका होत्या. शिवाजी महाराजांच्या आरमारात १६० युद्धनौका, ३०० छोटी जहाजे होती. पाच गुराबा आणि पंधरा गलबते मिळून या सर्वांचा एक सुभा होत असे. व्यापाराचे महत्त्व ओळखून शिवाजी महाराजांनी मिठाच्या व इतर वस्तूंच्या व्यापारांकरितां वासंतिक नौदल तयार केले होते. त्यांचा व्यापार मस्कत बंदराशी होत असल्याचे पुरावे इतिहासात मिळतात.

कल्याण, भिवंडी, पेण, पनवेल, कुलाबा, मालवण या ठिकाणी जहाजबांधणीची कामे केली जात असत. कोकण वसई प्रदेशात आढळणारे उत्तम सागाचे लाकूड या जहाज बांधणीसाठी वापरले जाई. रामचंद्रपंत अमात्य यांच्या 'आज्ञापत्रा'न वृक्षवल्लीसंबंधी उल्लेख आहे, तो पुढीलप्रमाणे - "आरमारास तक्ते, सोट, डोलाच्या काठ्या आदीकरून थोर लाकूड असावे लागते. ते आपले राज्यांमध्ये सागवान आदी वृक्ष आहेत. त्याचे जे अनुकूल पडेल ते हुजूर लिहून, हुजुराचे परवानगीने तोडून न्यावे. स्वराज्यातील आंबे, फणस आदी करून हेही लाकूड आरमाराचे प्रयोजनाची; परंतु त्यास हात लावू न द्यावा, काय म्हणून की ही झाडे वर्षा दोन वर्षांनी होतात ऐसे नाही. रयतेने ही झाडे लावून लेकरासारखी बहुत काळ जतन करून वाढवली, ती झाडे तोडीलियावरी त्यांचे दुःखास पारावर काय? लोकास दुःख देऊन ते जे कार्य करीन म्हणेल ते कार्य कारणासहित स्वल्प काळेच बुडोन नाहीसेच होते. किंबहुना धन्याचे पदरी प्रजापीडनाचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावे हानीही होते. याकरिता ही गोष्ट सर्वथा होऊ न द्यावी, कदाचित एखादे झाड जे बहुत जीर्ण होऊन कामातून गेले तरी त्याची धन्यास राजी करून द्रव्य देऊन त्याच्या संतोष न्यावे."

या आज्ञापत्रावरून राजांनी आंबा, फणंस अशी उपयुक्त झाडे तोडण्यास मनाई केलेली दिसते. प्रजेला उपयोगी पडणारी झाडे तोडून त्यांना दुःख देऊ नये, वृक्ष नसेल तर पर्यावरणाची हानी होते. जीर्ण झालेले झाडही त्याच्या मालकाला विचारून तोडावे, असे महाराजांचे वृक्षाविषयी धोरण होते. शिवाजी महाराजांनी नैसर्गिक परिस्थितीचा वृक्षांचा, वृक्षाच्या समाज उपयोगाचा, वृक्षतोडी संबंधीची तयार केलेले नियम यावरून महाराष्ट्रातील पर्यावरणाचा चांगलाच अभ्यास केलेला दिसून येतो.

आणीबाणीच्या काळात जहाजांची दुरुस्ती करणे, अन्नधान्याच्या आरमाराला पुरवठा करण्यासाठी व आरमाराला संरक्षण मिळावे, तसेच शत्रूच्या हल्ल्यापासून किनारपट्टीवरील प्रदेशाचे संरक्षण व्हावे यासाठी शिवाजी महाराजांनी अनेक सागरी दुर्गांची बांधणी केली. मराठा आरमाराकडे एकूण नऊ बंदरे होती. विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, पद्मदुर्ग, खांदेरी उंदेरी, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अलिबाग इत्यादी अनेक समुद्री किल्ले शिवाजी महाराजांनी बनवले. सिंधुदुर्ग हा किल्ला स्वतः महाराजांच्या देखरेखीखाली बांधला गेला. या किल्ल्याच्या बांधकामात पोर्तुगीज तंत्रज्ञांची मदत घेतली गेली. सिंधुदुर्ग किल्ल्याचा पाया घालण्यासाठी पाच खंडी शिसे ओतले गेले. स्वतः छत्रपती शिवाजी महाराज किल्ले बांधण्याच्या तंत्रात निष्णात होते.

सागरी किल्ल्यांची दुरुस्ती, धान्यसाठा, दारूगोळा यासाठी शिवाजी महाराज आर्थिक तरतूद करून खजिन्यातून बाजूला काढून ठेवत. किल्ल्याच्या आरमाराच्या डागडुजीसाठी १ लाख २५ हजार होन असणारा निधी ज्यास 'खास निधी' म्हणत तो उभारला गेला होता. आपत्ती निवारणासाठी व आपत्कालीन व्यवस्थापनासाठी हा राखीव निधी वापरला जाई. महाराजांचे हे आपत्ती व्यवस्थापनाचे तत्त्व त्यांच्यातील दूरदृष्टी या गुणाचा प्रकर्षाने परिचय घडवते.

आरमारातील सर्व सुभ्यांचा एक सरसुभा होता. या सरसुभ्याची दोन मोठी आरमार दले निर्माण केली गेली होती.

या प्रत्येक दलावर एक आरमारप्रमुख नेमला जाई. आरमारप्रमुखास माय नाईक व दर्यासारंग अशी पदे दिली जात. मराठा आरमारातील माय नाईक हे पद हिंदू भंडारी जातीकडे होते, तर दर्यासारंग हे पद मुस्लिमांकडे होते. महाराजांच्या आरमारात स्थानिक लोकांना प्राधान्य दिले जाई. यामध्ये कोळी, भंडारी, मलबारी, मुस्लिम, धनगर, आग्रे या जमातींमधील लोक असत. किनारपट्टीवरील हे स्थानिक लोक धाडसी खलाशी होते. त्यांच्या काटकपणाचा, समुद्रावरील अनुभवाचा फायदा करून घेऊन महाराजांनी आपले आरमार अधिक बळकट केले. या सैनिकांना दरमहा पगार दिला जाई. किल्ले बांधणाऱ्या मजूर, कारागिरांना महाराज वेळेवर व भरपूर प्रमाणात वेतन देत. महाराजांनी स्थानिक लोकांना आरमारात प्राधान्य देऊन त्यांची कार्यक्षमता स्वराज्याच्या कामी आणली. आरमाराच्या स्थापनेमुळे रयतेत नवीन स्फूर्ती निर्माण होऊन नोकऱ्यांच्या नवीन संधी निर्माण झाल्या. किनारपट्टीवरील सर्व जातीधर्मांच्या लोकांना मराठा आरमाराच्या आधिपत्याखाली महाराजांनी एकत्र आणले. समाजातील सर्व जातींच्या सैन्यांना त्यांच्या आरमारात एक समान स्थान होते.

शिवाजी महाराजांच्या आरमारामुळे मध्ययुगीन इतिहासात सामाजिक, आर्थिक, लष्करी, राजकीय, व्यावसायिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. महाराजांनी मराठा आरमाराच्या साहाय्याने स्वराज्यालगतच्या समुद्रावर संचार करण्यासाठी लागणारी परकीयांची लेखी परवानगीची पद्धत नष्ट करून समुद्र पारतंत्र्यातून मुक्त केला. सिद्दी जंजिरा, दंडराजापुरी या प्रदेशापुरतेच मर्यादित ठेवण्यास मराठा आरमारास यश आले. मराठ्यांच्या प्रदेशातील त्याच्या हालचालीवर नियंत्रण बसले. स्वराज्यालगतच्या समुद्रावर वर्चस्व प्रस्थापित झाल्याने सागरी व्यापाराला संरक्षण मिळाले. स्वराज्यातील व्यापार वाढून संपत्तीत भर पडली. किनाऱ्यावरील सर्व जहाजांवर नियंत्रण ठेवण्यात आले. कररूपाने स्वराज्याचा खजिना वाढू लागला. १६७० मध्ये मराठा आरमाराने स्वतःचे सामर्थ्य इतके वाढवले की, मुंबईच्या खाडीत महाराजांनी १६० युद्धनौका उभ्या करून इंग्रजांच्या मनात दहशत निर्माण केली. महाराजांच्या वाढत्या आरमार सामर्थ्यामुळे पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच या पाश्चात्त्य राजवटींच्या महत्त्वाकांक्षेला आळा बसला व त्यांनी महाराजांबरोबर नरमाईचे धोरण स्वीकारले.

ब्रिटिशांच्या बंदोबस्तासाठी महाराजांना मोठा प्रयास करावा लागला. त्यांच्या सत्तेला शह देण्यासाठी मुंबईजवळच्या खांदेरी बेटावर तटबंदी उभारली; परंतु ब्रिटिशांनी मोठा अडथळा निर्माण केला. महाराजांनी त्यावरसुद्धा मात करून ब्रिटिश आरमाराचा टिकाव लागू दिला नाही. सन १६६९ हे युद्ध चार महिने चालले होते. इंग्रजांकडे अवजड तोफा शस्त्रसज्ज युद्धनौका असूनदेखील मराठ्यांच्या पुढे त्यांचा टिकाव लागला नाही. महाराजांनी आखलेल्या युद्ध तंत्रामुळे ब्रिटिशांचा पराभव झाला. जलद हालचाली करून आणि मर्यादित मनुष्यबळाचा सोबत घेऊन ब्रिटिश आरमार नामोहरम झाले आणि खांदेरी बेट मराठ्यांची अजिंक्य तटबंदी झाली. मुंबई बेटावरील वसाहती आणि व्यापारावर मराठ्यांची सतत टांगती तलवार त्यानंतर तळपत राहिली. मुंबई बेटावर लागणाऱ्या प्रत्येक जहाजावर मराठ्यांचा दस्तक अपरिहार्य ठरला. त्याचा परिणाम असा झाला की, दरवर्षी इंग्रजांच्या परवानगीने मुंबईला छावणीसाठी येणारे सिद्दीचे सैन्य येईनासे झाले. या दोनही शत्रूंवर खांदेरी बेटामुळे मर्यादा आल्या.

**सारांश -**

शिवाजी महाराजांच्या आरमाराचा अभ्यास करताना अनेक बाबी प्रकर्षाने जाणवतात. महाराजांच्या आरमारी धोरणाचा अभ्यास केला, तर २१ व्या शतकातील अनेक समस्या नष्ट होतील, हे आजही ध्यानात घेतले पाहिजे. समुद्रकिनारा, किनारपट्टीवरील भौगोलिक प्रदेश, स्थानिक रहिवासी, भौगोलिक परिस्थितीनुसार त्यांच्यात सामावलेले गुण, सर्व महाराजांनी सोळाव्या शतकात अभ्यासले व त्याचा आरमार स्थापनेत वापर करून घेतला. शिवाजी महाराजांच्या सोळाव्या शतकातील या नियोजनाची परत प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची सध्याच्या काळात गरज आहे.

वृक्षांचे उपयोग, त्यांचे महत्त्व, पर्यावरणाचा समतोल, नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार, संधी हेरून नवीन ज्ञान प्राप्त करणे, उद्योग उभारणी, मुत्सद्दीपणा, दूरदृष्टी, विज्ञाननिष्ठा व आपत्ती व्यवस्थापन, असे शिवाजी महाराजांचे अनेक गुण त्यांच्या आरमार उभारणीतून आपल्याला दिसून येतात. गोव्यातल्या कदंबांच्या राज्यानंतर सुमारे तीनशे वर्षे कोणत्याही एतद्देशीय सत्तेकडे आरमार नव्हते. शिवरायांनी ते उभे केले, दर्या प्रसन्न केला. जनहिताचे शिवराज्य निर्माण करायला समुद्राने साथ दिली. शिवरायांचे आरमार पाहिल्यावर त्यांची विज्ञाननिष्ठा, आधुनिकता आणि भविष्याचा वेध घेण्याची दृष्टी आपल्यासमोर उभी राहते.



Late Ramesh... College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Tq. Sonpeth Dist. Parbhani

इतिहास हा भूतकाळ व भविष्यकाळ यांना जोडणारा वर्तमानकाळाचा दुवा असतो असे म्हटले जाते. "भूतकाळातील विविध घटना, राज्यकर्ते यांच्यापासून वर्तमानकाळात बरेच काही शिकून येणारा भविष्यकाळ हा सुरक्षित केला जातो. शिवाजी महाराजांची विज्ञाननिष्ठा, दूरदृष्टी, मुत्सद्देगिरी, हुशारी, व्यवहार कुशलता, लष्करी धोरण, आरमार स्थापना, महसूल पद्धत, शेतसाऱ्याबद्दलचे धोरण यांचा अभ्यास सध्याच्या वर्तमानकाळात केल्यास आपला भविष्यकाळ उज्ज्वल होईल यात तिळमात्र शंका नाही." असे प्रा. रोहिणी कोडीतकर आपल्या लेखात म्हणतात. मगच आपणास छत्रपती शिवाजी महाराजांच्या "प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते" या राजमुद्रेचा खरा सार समजला असे म्हणता येईल.

शोधनिबंधाच्या शेवटी जदूनाथ सरकार यांच्या एका इंग्रजीतील मताचा उल्लेख करणे येथे औचित्याचे ठरेल, असे मला वाटते. ते म्हणतात, "Shivaji was not only the maker of Maratha Nation but also the constructive genius emperor of mediaeval India. His political ideas was such that accept them today without any change." समकाळातही लागू होतील अशी अनेक ध्येयधोरणे शिवाजीराजांनी अमलात आणली, याचेच हे निदर्शक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

१) साळवी, पु. ग. : 'छत्रपती शिवाजी', व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८३


२) 'शिवकालीन पत्र सार संग्रह', खंड ३, पत्रांक ६३७, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, प्रथमावृत्ती १९३०

३) कुलकर्णी, अ. रा. : अशी होती शिवशाही, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती १९९९

४) काकडे सीताराम (संपा.) : कूळवाडीभूषण राजा शिवछत्रपती (छत्रपती शिवाजी महाराज : स्मारक ग्रंथ) प्रथमावृत्ती ५ ऑक्टोबर २०१०, पृष्ठ १५८ ते १६४

५) गाठाळ, एस. एस. : मराठ्यांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, सुधारित आवृत्ती जुलै २०१९

◆◆◆◆◆



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

MAH MAR 34737/13/1/2009-TC
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



कुळवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ।।ध्रु०।।
लंगोटयांस देई जानवीं पोषींदा कूणब्याचा ।
काल तो असे यवनांचा ।।
शिवाजीचा पिता शहाजी पुत्र मालोजीचा ।
असे तो डौल जहागिरीचा ।।
पंधराशें एकूणपन्नास साल फळलें ।
जुन्नर तें उदयासी आलें ।।
शिवनेरी किल्ल्यामध्यें बाळ शिवाजी जन्मलें ।
जिजीबाईस रत्न सांपडलें ।।
हातापायांचीं नखं बोटं शुभ्र प्याजी रंगीलें ।
ज्यांनीं कमळा लाजिवलें ।।
वरखालीं टिर्याख पोटर्याय गांठी गोळे बांधले ।
स्फटिकापरि भासले ।।
सान कटी सिंहापरी छाती मांस दुनावलें ।
नांव शिवाजी शोभलें ।।

– महात्मा जोतिराव फुले

